Maratha Vidya Prasarak Samaj. Nashik

# Arts and Commerce College, Vadner Bhairav,

Tal- Chandwad, Dist- Nashik

Website: - www.vadnercollege.ac.in Email: - principal@vadnercollege.ac.in

## Youth Festival Report-2019-20

MVP'S Arts and Commerce College, Vadner Bhairav, Tal- Chandwad, Dist- Nashik celebrated Annual Day Function on the occasion, of Birth Anniversary of Swami Vivekananda. College organized Youth Week from 17/01/2020 to 23/01/2020. For this, programme Shri. Ganesh Gurav, API, VadnerBhairav was presence as chief guest.

The programme began with the lighting of the lamp and garlanding the portrait of Goddess Saraswati. Shri. Ganesh Gurav addressing to the students to followed the path, which showed to our youth by Swami Vivekananda. Formerly programme started with releasing numerous balloons in the air. For this programme Shri, D. L. Aaba Pachorkar, Engineer Diliprao Dharrao, Prin. A. L. Bhagat, all teaching, non-teaching staff, all students were presence.

College organized various programmers during this Youth Week, which is described follow day by day.

On 17/01/2020 college organized various sport competition like short put, 100 meter sprint, long jump, Kabbadi and also Mehandi Competition. This competition manages and guided by Prof. N. R. Kakad, Prof G. R Gawali and Prof. J. S. Katale. At that day college also celebrated Chocolate Day.

On 18/01/2020 college celebrated Black and White and jeans and T-Shirt Day. College also organized Poster Presentation on theme of Sustainable Development.

Ten students are participated in this poster presentation competition, which guided by Dr. D. D. Gavhane.

On that, Day there is Rangoli Competition and Funfair. For Rangoli competition students draw on various theme like Save Girl, Save Tree, Save Water, Superstitious. All students are actively participated in these events. This event guided Prof. S R. Jadhav.

On 20/01/2020, College organized cricket match and Sangeetkhurchi competition under the guidance of Prof. N. R. Kakad and Prof. Gawali. There is four team participate in the cricket match. Students wear different kind of tie to celebrate tie and Rose day.

On 21/01/2020 college organized General Knowledge Quiz Competition. For this, competition students divided insix groups. For this programme prof. B. P. Gaikwad was guided to all students. During this period Kavi Sammelan (poet Conference), was also conducted by college under the guidance of Prof. S. N. Rathod. For, kavi Sammelean four poets were participate and express the different subject through their poems. Shri.PrashantKendale's poem subject was Rural Poetry and Nature, Shri. Rajendra Somwanshi subject was Urban life and Love, Shri. Vishnu Thore's was Rural Arts and Shri. Sudam Rathod' was Dog. These poets are presenting the various and different kind theme and subject of poem in that programme. Students are wearing different kind Series to celebrated Saree day on this day.

On 22/01/2020, all college students wear different dress to represent different culture. College also organized rally at Vadner Bhairav to show that dress up of students. Prof. D. H. Bhagure and Prof. S. N.Rathod guided that event.

On 23/01/2020 college was conducted miss-match day. For that day,students are wearing different dress, which was ode in style. All college students are participated and present in this programme.

On 24/01/2020, College organized the cultural activity programme. The chief guest of this programme was Shr. Ganesh Chandanshive. Shri.TushardadaShewale presided over this programme. Shri.UttambabaBhalerao , Director, MVP's , Chandwad, Raosaheb Fakirrao Bhalerao, Sarapanch, Vadner Bhairav, Shri. Dattatey Mali, Upsarapanch, Vadner Bhairav, Engineer Diliprao Dharrao was also presence for this programme.

Shri. Ganesh Chandanshive said that, folk arts are very effective medium. The life of society is presenting by the folk arts.  Too many people are living their life through these folk arts.

Students were actively participated in these cultural activities and performed in dance, drama, one act play, group singing etc.Students are participated every programme and activity very enthusiastically during this week.






**DAY 1 :- INAUGURATION PROGRAMME PHOTO**










Youth festival start with throw the balloon in air with handed on chief guest Mr. Ganesh Gurav (API Vadner Police Station)

**Programme link on college fecebook page**

**https://www.facebook.com/groups/1021418164690022/permalink/1534111853420648/**

**Youth Festival Inauguration News in Local paper**

# स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे अनुकरण करा

## सहायक पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी** | वडनेर भैरव




वडनेर महाविद्यालयात वार्षिक युवा सप्ताहप्रसंगी मार्गदर्शन करताना वडनेरभैरव पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक गणेश गुरव. समवेत इतर मान्यवर.

युवकांना स्वामी विवेकानंद यांनी आपल्या विचारातून प्रेरणा आणि दिशा देण्याचे महान कार्य केले आहे. त्यांच्या विचारांवर वाटचाल करून तरुणांनी स्वतःची ओळख करून आदर्श समाज निर्माण करावा, असे आवाहन वडनेरभैरव पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांनी केले.

वडनेरभैरव भैरव येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्ताने शुक्रवार दि. १७ ते २४ जानेवारीपर्यंत आयोजित केलेल्या युवा सप्ताहाच्या शुभारंभप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य ए. एल. भगत होते. व्यासपीठावर उपप्राचार्य निशांत वडघुले, प्रा. डी. डी. गव्हाणे, प्रा. ज्ञानेश्वर भगुरे, प्रा. डी. एस. पाटील, प्रा. एस. एम. कुमावत आदी होते.

प्राचार्य ए. एल. भगत यांनी प्रास्ताविक केले. गोळाफेक, लांब उडी, धावणे, कबड्डी, मेंदी आदी स्पर्धा घेण्यात आल्या.

युवा सप्ताहात २२ रोजी सकाळी ९ वाजता काव्यसंमेलन होणार आहे. २४ जानेवारी रोजी गुणगौरव समारंभ सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी 'बाजीराव मस्तानी' फेम पार्श्वगायक डॉ. गणेश चंदनशिवे यांची प्रमुख उपस्थिती असेल. मविप्रच्या सरचिटणीस नीलिमा पवार या प्रमुख अतिथी म्हणून तर चांदवड तालुका संचालक उत्तमबाबा भालेराव हे अध्यक्षस्थानी असतील. यावेळी सरपंच शोभा बेंडके, उपसरपंच रावसाहेब भालेराव, मुख्याध्यापक के. आर. सोनवणे, सनराइज स्कूल प्राचार्या ए. जी. नायडू, स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीपराव घारराव, शालेय ज्युनिअर कॉलेज अध्यक्ष हिरामण सोनवणे, शालेय समिती अध्यक्ष पोपटराव पवार, सनराईज स्कूल अध्यक्ष राजाभाऊ भालेराव व सर्व सदस्य उपस्थित राहणार आहे.

Day 2 Activity photo







Students Participated Tie Day & Mehandi Competition

# Day 3 Activity photo










Students Participated in Poster Presentation & Rangoli Competition

## Day 4 Activity photo









Glimpses of kavi Sammelean

**Programme link on college fecebook page**

**https://www.facebook.com/groups/1021418164690022/permalink/1538318876333279/**

**https://www.facebook.com/100004812647176/videos/1257408767762866/**

सकाळ

# वडनेरभैरव महाविद्यालयात कवितांची अक्षरशेती

सकाळ वृत्तसेवा

वडनेरभैरव, ता. २२ : येथील मराठा विद्याप्रसारक समाजाच्या कला व वाणिज्य महाविद्यालयात कवितांची अक्षरशेती कार्यक्रमात विविध कवींच्या कवितांनी रंग भरला. यामध्ये प्रेम, आई-बाप, शेतकरी आदी विषयांवर राजेंद्र सोमवंशी, प्रशांत केंदळे, विष्णू थोरे, संदीप देशपांडे या निमंत्रित कवींनी कविता सादर केल्या.

बापलेक या कवितेच्या ओळी कवी प्रशांत केंदळे यांनी विरहरसात सादर करताना उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या.



वडनेरभैरव : कला, वाणिज्य महाविद्यालयात 'बाप' विषयावर कविता सादर करताना प्रशांत केंदळे. शेजारी कवी विष्णू थोरे, प्राचार्य अमोल भगत, संदीप देशपांडे, राजेंद्र सोमवंशी आदी.

प्राचार्य ए. एल. भगत यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. कवी विष्णू थोरे यांनी काव्य मैफलीचे सूत्रसंचालन केले. श्री. थोरे यांनी सादर केलेल्या 'मनातल्या गुपिताचे खोल तू राज गं, इश्काची इलाजाची दवा मला पाज गं' या कवितेला कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दाद दिली. कवी थोरे यांनी 'तुझा जलम झाल्यावर तुझा सुखावला बाप गं, तुला सासरी धाडून केलं गाय इकल्याचं पाप गं' या कवितेने मुलींच्या डोळ्यात अश्रू आले. या वेळी व्यासपीठावर प्राचार्य ए. एल. भगत, उपप्राचार्य निशांत वडघुले, एच. एन. बच्छाव, व्ही. एस. जाधव, एस. एम. कुमावत, डी. डी. गव्हाणे आदी उपस्थित होते.

*बाप मनात जपतो*
*त्याची सोनपरी*
*लेक सोडताना घर*
*त्याचे फुटती अंबर*
*काळजाचे होते तेव्हा*
*पाणी पाणी*
*एकांतला कळते*
*बापलेकाची कहाणी*

Nashik, Malegaon
23/01/2020 Page No. 4

लोकमत




वडनेरभैरव महाविद्यालयात युवा सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात कविता सादर करताना राजेंद्र सोमवंशी. समवेत प्राचार्य ए. एल. भगत, उपप्राचार्य निशांत वडघुले, प्रशांत केंदळे, विष्णू थोरे व संदीप देशपांडे आदी.

Hello Nashik Gramin
Page No. 7 Jan 23, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# वडनेरला कवितेची अक्षरशेती कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**वडनेरभैरव** : येथील मविप्रच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात युवा सप्ताहानिमित्त 'कवितेची अक्षरशेती' हा निमंत्रित कवींच्या उपस्थितीत काव्यवाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला. उपस्थित कवींनी सादर केलेल्या सामाजिक आशयाच्या कवितांनी मैफलीत रंगत आणली.

या मैफलीत प्रशांत केंदळे यांनी 'बापलेक', विष्णू थोरे यांनी 'मनातल्या गुपिताचं खोल तू राज गं', राजेंद्र सोमवंशी यांनी 'माई सावित्रीने दिले आम्हा लेखनाचे बळ', तर संदीप देशपांडे यांनी 'जागोजागी भेटते मला माझी मुलगी' ही कविता सादर केली. सर्वच कवितांना उपस्थितांनी भरभरुन दाद दिली. कवी थोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य ए. एल. भगत यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. व्यासपीठावर उपप्राचार्य निशांत वडघुले, ज्यू. कॉलेज प्रमुख एच. एन. बच्छाव, गुणगौरव सोहळा प्रमुख व्ही. एस. जाधव, एस. एम. कुमावत ,प्रा. डी. डी. गव्हाणे आदी उपस्थित होते.

Hello Nashik Gramin
Page No. 7 Jan 23, 2020
Powered by: erelego.com

# Day 5 Activity photo

| | |
|---|---|
|  |  |
|  |  |

Social Awareness Rally

**Programme link on college fecebook page**

https://www.facebook.com/amolbhagat2936/videos/3337023906372211/

**https://www.facebook.com/groups/1021418164690022/permalink/1537461859752314/**t

लोकमत

पप्पू वडावणे, वडनेरभैरव



वडनेरभैरव येथील मराठा विद्या प्रसारक समाज संचालित कला व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी समाज जागृतीसाठी काढलेली गावफेरी.

## वडनेरभैरव : विद्यार्थ्यांनी केल्या वेशभूषा

# जागृतीसाठी गावफेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वडनेरभैरव** : येथील मराठा विद्याप्रसारक समाज संचालित कला व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी समाजजागृतीसाठी गावफेरी काढली. स्वामी विवेकानंद जयंती, युवा दिनानिमित्त दि. १७ ते २४ जानेवारीदरम्यान युवा सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहांतर्गत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

विविध सामाजिक समस्यांवर जनजागृती करण्याच्या उद्देशाने संपूर्ण गावातून गावफेरी काढण्यात आली होती. या फेरीत विविध सामाजिक विषयांवर जनजागृती करणारे देखावे/चित्ररथ साकारण्यात आले होते. यामध्ये स्त्रीभ्रूणहत्या रोखा, हैदराबाद येथील प्रियांका रेड्डी प्रकरण, वारकरी सांप्रदायिक आदर्श दिंडी, गडकिल्ले वाचवा, विविधतेत एकता-देशाची शक्ती !, महाराष्ट्राची लोकपरंपरा, शिक्षणाने केला समाजाचा उद्धार आदी विविध विषयांवरील चित्ररथ, देखावे सहभागी झाले होते.

गावातील ग्रामपंचायत समोर आणि शनि चौक येथे विद्यार्थ्यांनी पथनाट्ये सादरीकरण केले.

क्षमता व योग्यता निर्माण व्हावी यासाठी आमचा हा गावफेरी उपक्रम असतो, असे मत यावेळी प्राचार्य ए. एल. भगत यांनी व्यक्त केले. प्रा. ज्ञानेश्वर भगुरे यांनी या गावफेरीचे संयोजन केले. महाविद्यालयाचे सर्वच प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी सहभागी झाले होते.

### आनंदमेळ्याचा उत्साह

- वडनेरभैरव येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात सुरु असलेल्या युवा सप्ताहांतर्गत शनिवारी आनंद मेळा, ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाइट डे, रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी आनंद मेळ्यात विविध खमंग व चटकदार पदार्थांचे स्टॉल मांडले होते. विद्यार्थ्यांनी स्टॉलला भेटी देऊन विविध पदार्थांचा आस्वाद घेतला. त्याचबरोबर रांगोळी स्पर्धादेखील घेण्यात आली. विद्यार्थिनींनी बेटी बचाव बेटी पढाव, अवयवदान, जलसुरक्षा अशा विविध विषयांवर रांगोळ्या रेखाटल्या. मविप्रच्या सेवक संचालक नंदा सोनवणे यांच्या हस्ते आनंदमेळा व रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन झाले. त्यांनी या स्पर्धांचे परीक्षण केले. प्राचार्य ए.एल. भगत व प्राध्यापक उपस्थित होते.

# १५८ गुन्हेगार तडीपार

**नाशिक** : शहर व परिसरातील गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस आयुक्तालयाकडून परिमंडळ-१ व २मधील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील शरीराविरुद्धचे दोनपेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगारांचा शोध घेत २०१९ साली तब्बल १५८ गुन्हेगारांना शहरासह जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले.

शहरात वाढलेल्या गुन्हेगारीच्या घटनांना पायबंद घालून कायदासुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांनी सर्व उपायुक्तांना आदेशित करत रेकॉर्डवरील गुन्हेगारांची 'ब्ल्यू प्रिंट' तयार करुन त्यांचे तडीपारीचे प्रस्तावांची चौकशी पूर्ण केली. चौकशीअंती वारंवार सराईतपणे गुन्ह्यात सक्रिय असणाऱ्या एकूण १५८ गुन्हेगारांना शहर व जिल्ह्याबाहेरचा रस्ता दाखविण्यात आला. किमान दोन वर्षांकरिता गुन्हेगारांना हद्दपार केले गेले.

- आयुक्तालयाकडून करण्यात आलेल्या या कारवायांमुळे गुन्हेगारांमध्ये वचक निर्माण होण्यास मदत झाल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. मोक्काच्या कारवायांमध्ये मुथूट फायनान्स दरोड्यातील संशयित आरोपींसह काही सोनसाखळी, चंदनचोरांसह समावेश आहे.

दरम्यान, एमपीडीए कायद्याखाली १२ गुन्हेगारांना एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले. तसेच मोक्काअंतर्गत सहा प्रस्ताव तयार करुन गंभीर स्वरुपाची संघटित गुन्हेगारीमध्ये सक्रिय सहभागी असणाऱ्या एकूण ३१ संशयित आरोपींविरुद्ध मोक्काची कारवाई आयुक्तालयाकडून करण्यात आली. शहरातील २३८ सराईत गुन्हेगारांची जंत्री काढण्यात आली असून, त्यांच्या तडीपारीच्या कारवाईच्या प्रस्तावांची चौकशी सुरु आहे. लवकरच चौकशी पूर्ण होऊन तडीपारीचे आदेश निर्गमित करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



वडनेरभैरव : गावफेरीत विविध सामाजिक विषयांवर जनजागृती करणारे देखावे व चित्ररथ.

**युवा सप्ताह** • गावफेरीत विद्यार्थ्यांनी ठिकठिकाणी सादर केले पथनाट्य

# वडनेरभैरव महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून गावफेरी, सामाजिक समस्यांवर जनजागृती

**प्रतिनिधी** | वडनेरभैरव

मराठा विद्या प्रसारक समाज संचलित येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती, युवा दिनाच्या निमित्ताने दि. १७ जानेवारी ते दि. २४ जानेवारी हा 'युवा सप्ताह' म्हणून साजरा करण्यात येत आहे.

या सप्ताहांतर्गत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून विविध सामाजिक समस्यांवर जनजागृती करण्याच्या उद्देशाने येथे 'गावफेरी' काढण्यात आली. यात विविध सामाजिक विषयांवर जनजागृती करणारे देखावे, चित्ररथ विद्यार्थ्यांच्या वतीने साकारण्यात आले होते. यामध्ये स्त्रीभ्रूण हत्या रोखा, हैदराबादचे प्रियांका रेड्डी प्रकरण, वारकरी सांप्रदायिक आदर्श दिंडी, गडकिल्ले वाचवा, विविधतेत एकता-देशाची शक्ती, महाराष्ट्राची लोकपरंपरा, शिक्षणाने केला समाजाचा उद्धार आदी विविध विषयांवरील आठ चित्ररथ सहभागी झाले होते.

ग्रामपंचायतीसमोर आणि शनि चौक येथे विद्यार्थ्यांनी पथनाट्ये सादर केले. 'मतदारराजा जागा हो - लोकशाहीचा धागा हो' या रासेयोच्या स्वयंसेवकांनी सादर केलेल्या पथनाट्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

प्राचार्य ए. एल. भगत यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान घेऊन मर्यादित न राहता घेतलेल्या ज्ञानाचा समाजजागृतीसाठी वापर केला पाहिजे. समाजात जाऊन विविध विषयांचे सादरीकरण करण्याची विद्यार्थ्यांत क्षमता व योग्यता निर्माण व्हावी यासाठी आमचा हा गावफेरी उपक्रम असतो, असे सांगितले.

यावेळी ग्रामस्थ आणि सलादेबाबा समाधी ट्रस्टचे सुरेश सलादे यांनी विद्यार्थ्यांच्या या गावफेरीचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी समाजजागृतीसाठी केलेल्या या अनोख्या प्रयत्नांचे ग्रामस्थांनी कौतुक केले. प्रा. ज्ञानेश्वर भगुरे यांनी या गावफेरीचे संयोजन केले. महाविद्यालयाचे सर्वच प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, आणि विद्यार्थी या गावफेरीत सहभागी झाले होते.

<u>Day 6 Activity photo</u>













Funfair at Youth festival

Cultural Programme activity










## **Programme Links:-**

https://www.facebook.com/groups/1021418164690022/permalink/1540287182803115/

https://youtu.be/GdENdcWtbzA

https://youtu.be/7D4rihFn-Xg

https://www.facebook.com/groups/1021418164690022/permalink/1539156006249566/

https://www.facebook.com/groups/1021418164690022/permalink/1539159649582535/

**अनमोल सल्ला** • वडनेरभैरवला युवा सप्ताहाचा समारोप

# सिनेमाची दुनिया बेगडी; संतांचे काव्य अमूल्य ठेवा : चंदनशिवे

**प्रतिनिधी** | वडनेर भैरव

सिनेमाची दुनिया बेगडी आहे. आपली खरी नाळ ग्रामीण भाषेशी जुळली आहे. ग्रामीण भाषेतील माती ही सृजनशील आहे. शहरात हे नाही तरुण पब्जीत गुंतला आहे ही विकृती आहे. अशा विकृतींना सरळ करण्याची ताकद आपल्या संतांच्या काव्यात आहे. आपल्या संत पंत काव्याने खूप मोठा ठेवा आपल्याला दिला आहे. त्यातून आपण जीवनाला आकार द्यावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र लोककला अकादमीचे अध्यक्ष व पार्श्वगायक गणेश चंदनशिवे यांनी केले.

कला व वाणिज्य महाविद्यालय वडनेरभैरव येथे युवा सप्ताहात गुणगौरव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मविप्रचे संचालक उत्तमबाबा भालेराव होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष दिलीपराव धारराव, हिरामण शिंदे, डी. एल. पाचोरकर, प्राचार्य ए. एल. भगत, सरपंच शांताबाई बेंडके, योगेश साळुंके, संपत वक्ते, एन. डी. निकम, विकास पाचोरकर, शशिकांत जाधव, शंकरराव आहेर, बाळासाहेब शिंदे, परशराम पाचोरकर, दिनकर जमधडे, दत्तात्रय जमधडे, शिवाजी पवार, रामकृष्ण पगार, नानासाहेब वाघ, दत्तात्रय माळी, डॉ. विक्रम सलादे, मनिषा पगार उपस्थित होते.



युवा सप्ताह समारोपात वार्षिक नियतकालिक 'भैरव' कृषी विशेषांकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

यावेळी गणेश चंदनशिवे यांनी संत एकनाथांचे 'भूत जबर मोठं ग बाई' या भारुडातून प्रबोधन केले. बाजीराव मस्तानी या चित्रपटात गायलेले 'नभातुनी आली अप्सरा, अशी सुंदरा साज सजवून आली हो' हे गीत सादर केले. अण्णा भाऊ साठे यांची 'माझी मैना गावाकडे राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली'' ही लावणी पहाडी आवाजात सादर केली. पंचवटी महाविद्यालयाचे प्रा. प्रवीण जाधव यांनी तानाजी मालुसरेंचा पोवाडा सादर केला. उत्तमबाबा भालेराव यांनीही मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते 'भैरव' विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. सरपंच व सदस्यांचा महाविद्यालयातर्फे सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास उपप्राचार्य एन. डी. वडघुले, डॉ. डी. डी. गव्हाणे, सुदाम राठोड, भीमराज गायकवाड, राणी पाटील, प्रमोद निकम, प्रा. गांगुर्डे, दिलीप पाटील, एस. आर. जाधव, आर. आर. शिंदे उपस्थित होते. पूनम कान्हे हिने अहवाल वाचन केले. प्रा. ज्ञानेश्वर भगुरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विठ्ठल जाधव यांनी आभार मानले.